# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

**दिनांक १६/०९/२०२२ (शुक्रवार)**

**(सायंकाळ)**

---

## खून करणाऱ्या आरोपीला कोर्टातुन शिक्षा

पो.स्टे. रामटेक :— दिनांक १०/०२/२०१८ चे १९.१८ वा. दरम्यान फिर्यादी नामे— किसना चिरकुट कोराम, वय ५७ वर्ष, रा. महाराजपुर रामटेक यांच्या रिपोर्ट वरुन पो.स्टे. रामटेक येथे अप. क्र. ८९/२०१८ कलम ३०२ भादवी कायद्यान्वये गुन्हा नोंद झालेला होता.

दिनांक ०५/०२/२०१८ चे १०.५० वा. ते ११.०० वा. सुमारास आरोपी नामे— विनोद बालचंद्र कोराम, वय २६ वर्ष, रा. महाराजपुर रामटेक हा त्याच्या पत्नीसोबत झगडाभांडण करून मारहाण करित असतांना मृतक नामे— आलाराम किसना कोराम, वय २७ वर्ष, रा. महाराजपुर रामटेक याने आरोपीस समजाविण्यास गेला असता आरोपीने मृतकास म्हटले 'तु कोण आमचे पती—पत्नीमध्ये बोलणारा' असे म्हटल्यावर मृतक अंगणातुन जात असतांना आरोपीने त्याला पकडून खाली जमिनीवर आपटले व त्याची मान मुरगडून बेशुद्ध होईपर्यंत गळा दाबून ठेवला व उपचारादरम्यान त्याचा मृत्यु झाला. आरोपीला दि. १०.०२.२०१८ चे २३.१४ वा. अटक करण्यात आले.

सदर प्रकरण्याचे तपास तत्कालीन पोउपनि श्री बोरसरे, पो.स्टे. रामटेक यांनी करून सदर प्रकरण न्याय प्रविष्ठाकरीता मा. कोर्टामध्ये सादर केले. आज दिनाक १६/०९/२०२२ रोजी मा. कोर्ट विद्यमान न्यायाधीश श्री एस.बी. अग्रवाल, न्यायाधिश, नागपूर यांनी वरील नमुद आरोपीला कलम ३२५ भादंवि. मध्ये ०५ वर्ष सश्रम कारावास व २५,०००/—रु. दंड व दंड न भरल्यास ६ महिने सश्रम कारावास अशी शिक्षा ठोठावली आहे.

सरकारचे वतीने एपीपी श्री दुबे यांनी काम पाहीले. कोर्ट कामात पैरवी अधिकारी म्हणुन मसपोनि श्रीमती शुभांगी वाझे, पोउपनि भवानीप्रसाद मिश्रा तर कर्मचारी सहा.फौज. श्री. सुनिल डोंगरे, पोहवा मनोज तिवारी, पोशि संदीप सहारे यांनी मदत केली आहे.

**पोलीस माहिती कक्ष**
**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**